**नियमीत दिवाणी दावा क. १३/२०२२**
**शेख मयोनोद्दीन वि.साजेदअली खान**

# निशाणी क. ०५ वरील आदेश

(पारीत दि. १०.१०.२०२२)

१. वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम ३९ नियम ०१ व ०२ अंतर्गत तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील प्रतिवादीचे म्हणणे वाचले. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. अभीलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले.

३. दोन्ही पक्षाचे कथन व प्रतीकथन विचारात घेता पुढील मुद्दे माझे समोर उपस्थीत होतात व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | वादीच्या हितात सकृतदर्शनी उत्तम केस आहे काय ? | **नकारार्थी** |
| **२.** | वादीच्या बाजूने सोयीचे पारडे आहे काय? | **नकारार्थी** |
| **३.** | जर वादीच्या हितात तात्पुरता मनाई हुकूम आदेश दिला नाही, तर वादीचे अपरिमीत नुकसान होईल काय ? | **नकारार्थी** |
| **४.** | काय आदेश ? | **अर्ज नामंजूर करण्यात आला** |

## कारणमिमांसा
## मुद्दे क. ०१ ते ०३ करिता

४. वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्नीत असून त्यासंबंधी अभीलेखावर प्राप्त झालेला पुरावा समान दिसून येतो. त्यामुळे सर्व मुद्दे एकत्रीतपणे निष्कर्ष नोंदविण्याकरिता घेतले आहे.

५. वादीच्या कथनाप्रमाणे तो मौजे मसला, ता. परतूर, जि. जालना येथील शेत गट क्र. १९, एकूण क्षेत्रफळ १०.२४ हे.आर. शेतजमीन पैकी ०.३३ हे.आर. शेतजमीनीचा मालक असून त्याच्या पुर्वेस अलमशहा मोहम्मद यांची शेतजमीन, पश्चीमेस प्रतिवादी क्र. ०१ यांची जमीन, दक्षीणेस प्रतिवादी क्र. ०१ यांचा गाडी रस्ता व उत्तरेस ज्ञानेश्वर बाजीराव काळदाते यांची जमीन (यापूढे सोयीच्या दृष्टीने वाद शेत असे संबोधण्यात येते).

६. वादीने दि. ०५.०१.२०२१ रोजी नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. १०३/२०२१ नुसार वाद शेतीची प्रतिवादी क्र. ०१ ला विक्री करून दिली होती. सदर खरेदी विक्रीचा व्यवहार एकूण मोबदला रूपये १,६०,०००/— मध्ये ठरला होता. सदर मोबदला देण्याकरिता प्रतिवादी क्र. १ ने वादीला महाराष्ट्र ग्रामीण बॅक शाखा परतूर या बॅकेचा धनादेश क्र. ०२२६२३ दि. ०५.०३.२०२१ दिला होता. वादीने दिलेला सदर धनादेश हा पोस्ट डेटेड होता. त्यामुळे वादीने दि. ०५.०३.२०२१ रोजी सदर धनादेश वटविण्याकरिता टाकला असता प्रतिवादी क्र. ०१ च्या खात्यात पुरेशी रक्कम नाही, म्हणून अनादरीत होवून वादीला परत आला. त्यानंतर वादीने प्रतिवादी क्र. ०१ सोबत संपर्क केला असता प्रतिवादी क्र. ०१ ने वादीला काही दिवस थांबण्यास सांगितले. परंतु प्रतिवादी क. ०१ ने वादीला अनादरीत धनादेशाची रक्कम देण्यास नकार दिला.

७. त्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ ने दि. १०.०२.२०२१ रोजी वाद शेत ०.३३ हे.आर. व प्रतिवादी क्र. ०१ ची स्वत:ची जमीन ०.११ हे.आर. अशी एकूण ०.४४ हे.आर. शेतजमीन प्रतिवादी क्र. २ ला नोंदणीकत खरेदीखत दस्त क्र. ५०५/२०२१ नुसार विक्री करून दिली. सदर खरेदीखतानुसार प्रतिवादी क्र. २ च्या

नावे महसूल दप्तरी नोंदी झाल्या असून तो कोणत्याही क्षणी सदर वाद शेत कोणालाही विकत देवू शकतो. वास्तविक प्रतिवादी क्र. ०१ ने वादीकडून करून घ ेतलेले खरेदीखत विनामोबदला असल्यामुळे कायद्यात निरर्थक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.०२ ने वाद शेत इतर कोणालाही कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करू नये, या आशयाचा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याची विनंती केली आहे.

८. प्रतिवादी क्र. ०१ दाव्यात पैरवी कामी हजर झाले, परंतु त्यांनी त्यांचे लेखी बयाण किंवा मनाई हुकूम अर्जावर उत्तर सादर केले नाही. त्यामुळे त्यांचेविरूद्ध दावा विना कैफीयत व अर्ज विना उत्तर पुढे चालविण्यात आला. परंतु प्रतिवादी क्र. ०२ यांनी निशाणी क्र. २६ नुसार लेखी कैफीयत सादर करून वादीचा दावा व मनाई हुकूमाचा अर्ज नाकारला. प्रतिवादी क्र. ०२ च्या कथनाप्रमाणे अनादरीत झालेल्या धनादेशाबाबत वादीने प्रतिवादी क्र. ०१ विरोधात कलम १३८ पराक्रम्य विलेख अधिनियम अंतर्गत प्रकरण दाखल केले असून प्रलंबीत आहे. वादीने प्रतिवादी क्र. ०१ ला करून दिलेल्या खरेदीखत क्र. १०३/२०२१ मध्ये दाखल केल्याप्रमाणे त्याला धानदेश क्र. ०२२६२३ आधारे संपूर्ण रक्कम मोबदला मिळाल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे वादीला प्रस्तुत दावा दाखल करण्यासाठी कोणताही अधिकार उरत नाही. प्रतिवादी क्र. ०२ ने केवळ प्रतिवादी क्र. ०१ कडून मिळकत खरेदी केली नसून शेख मोहीन शेख जब्बार, शेख मोसीन शेख मोईन यांच्याकडून प्रत्येकी ०.५६ हे.आर. व १.०० हे.आर. शेत जमीन एकत्रीत रित्या खरेदीखत क्र. ५०५/२०२१ नुसार खरेदी केली आहे. त्यामुळे सदर खरेदीखत रद्द करून मागण्याचा वादीला कोणताही अधिकार नाही. वादीने प्रतिवादी क्र. ०२ ने केलेले खरेदीखत क्र. ५०५/२०२१ हे १२,८०,०००/– मुल्यांकनाचे

असल्यामुळे त्यास त्यावर वादीने कार्ट फी भरलेली नाही. खरेदी खत क्र. ५०५/२०२१ मधील इतर शेत विक्रेत्यांना वादीने या दाव्यात आवश्यक पक्ष म्हणून जोडलेले नाही. या सर्व कारणावरून प्रस्तुत अर्ज खारीज होण्यास पात्र आहे.

९. वादीने दस्तेएवजांची यादी निशाणी क्र. ४ नुसार नोंदणीकृत खरेदी खत क्र. १०३/२०२१, फेरफार उतारा क्र. १३२३, नोंदणीकृत खरेदीखत क्र. ५०५/२०२१, फेरफार उतारा क्र. १३२९, धनादेश क्र. ०२२६२३ ची छायांकित प्रत, धनादेश परतीचा मेमो व गट क्र. १९ चा सातबारा असे कागदपत्रे दाखल केले आहे. वादीने सादर केलेल्या खरेदीखत क्र. १०३/२०२१ चे अवलोकन केले असता वादीने वाद शेत प्रतिवादी क्र. ०१ ला एकूण मोबदला रूपये १,६०,०००/— मध्ये विकत दिल्याचे स्पष्ट होते. सदर मोबदला वादीला महाराष्ट्र ग्रामीण बॅक, शाखा परतूर यांचे धनादेश क्र. ०२२६२३, दि. ५.३.२०२१ नुसार मिळाले आहे व सदर रकमेबद्दल काही तक्रार राहीलेली नाही असा मजकूर खरेदीखतामध्ये नमूद केला आहे. सदर खरेदीखताचे अवलोकन केले असता एक तर वादीला प्रतिवादी क्र. ०१ ने पोस्ट डेटेड चेक दिला असून जर त्या पोस्ट डेटेड चेक प्रमाणे वादीला मोबदल्याची रक्कम मिळाली नाही, तर खरेदी खत क्र. १०३/२०२१ रद्द समजण्यात येईल किंवा सदर खरेदीखत रद्द करून घेण्याचा वादीला अधिकार राहील, याबाबत कोणताही मजकूर लिहीण्यात आला नाही. त्यामुळे भारतीय करार कायदा कलम २५ प्रमाणे वादीला मोबदल्याची रक्कम मिळाली नाही, म्हणून करण्यात आलेला करार अवैध झाला, असे म्हणता येणार नाही. कारण वादीकडे कथन केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ०१ ने दिलेला धनादेश

आहे, त्यामुळे वादी हा सदर धनादेशात नमूद असलेल्या रकमेच्या वसूली करिता दिवाणी दावा दाखल करून रक्कम वसूलीची मागणी करू शकतो किंवा कलम १३८ पराक्राम्य विलेख अधिनियम अंतर्गत प्रतिवादी क्र. ०१ च्या विरोधात फौजदारी कार्यवाही करू शकतो. परंतु अशी कोणतीही कार्यवाही न करता वादीने सरळ प्रतिवादी क्र. ०२ विरोधात खरेदीखत क्र. ५०५/२०२१ ला स्थगिती मागीतली आहे. वास्तविक खरेदी खत ५०५/२०२१ चे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. ०२ ने प्रतिवादी क्र ०१ ची मालमत्ता खरेदी केली नसून त्यासोबत आणखी दोन इसमांच्या मालमत्ता एकूण मुल्य रूपये १२,८०,०००/— देवून खरेदी केले आहेत. त्यामुळे संपुर्ण खरेदीखत क्र. ५०५/२०२१ ला स्थगीती दिल्यास प्रतिवादी क्र. ०२ ला गैरसोय होईल. कारण मोबदला न देण्यासंबंधीचा वाद हा वादी व प्रतिवादी क्र. ०१ यांच्यामधील आहे. त्यात प्रतिवादी क्र. ०२ चा कोणताही दोष दिसून येत नाही. महत्वाचे म्हणजे वादीला प्रतिवादी क्र. ०१ कडून मोबदला रक्कम वसूलीकरिता इतर विकल्प उपलब्ध असतांना वादीने सदर विकल्पाचा अवलंब करून प्रतिवादी क्र. ०१ विरूद्ध मोबदला वसूलीची कार्यवाही न करता ज्या वादीचा प्रतिवादी क्र. ०२ सोबत कोणताही संबंध नसताना त्याच्या हितात करून देण्यात आलेले खरेदीखत क्र. ५०५/२०२१ ला स्थगीती मागीतली आहे. निश्चितच त्यामुळे प्रतिवादी क्र. ०२ ची अपरिमीत हानी होईल.

१०. वादी हा वाद शेताचा मालक होता, त्याने प्रतिवादी क्र. ०१ ला वाद शेत विकले व मोबदल्यापोटी दिलेला धनादेश अनादरीत झाल्यामुळे वादीला वाद शेत विक्रीच्या मोबदल्याची रक्कम मिळाली नाही, याबाबत जरी अभिलेखावर निष्पन्न होत असले तरी वादीला प्रस्तुत दावा दाखल करून प्रतिवादी क्र. ०२ च्या

हितात असलेल्या विक्रीपत्राच्या विरूद्ध दाव्यात मागणी करण्याऐवजी वादीला प्रतिवादी क्र. ०१ च्या विरूद्ध सरळ धनादेशाच्या आधारे मोबदला वसूलीची किंवा कलम १३८ परक्राम्य विलेख अधिनियम अन्वये फौजदारी कार्यवाही करण्याची दाद उपलब्ध असतांना वादीने सदर दाद न मागता प्रस्तुत अर्ज सादर केला आहे. त्यामुळे निश्चीतच वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी उत्तम केस असल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. ०२ याने प्रतिवादी क्र. ०१ व ०२ व इतर विक्रेते यांना रूपये १२,८०,०००/— मोबदला देवून खरेदी खत क्र. ५०५/२०२१ करून घेतले आहे, त्यामुळे जर प्रतिवादी क्र. ०२ विरूद्ध कोणताही स्थगनादेश पारित केला, तर त्यामुळे प्रतिवादी क्र. ०२ ला गैरसोय निर्माण होईल व त्यामुळे प्रतिवादी क्र. ०२ चे अपरिमीत नूकसान होईल. अशाप्रकारे वादी त्याच्या हितात तात्पुरता मनाई हुकूम आदेश मिळण्यास पात्र नाही. करिता मी मुद्दे क्र. ०१ ते ०३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मूद्दा क्र. ०४ च्या उत्तराकरिता पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. वादीचा तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज (निशाणी क्र. ०५) नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट राहील.

LILADHAR DADARAO KORDE
Digitally signed by LILADHAR DADARAO KORDE
Date: 2022.10.13 17:53:19 +0530

**(लिलाधर दा. कोरडे)**

दि. १०.१०.२०२२

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

**परतूर.**